**विषय** :- कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग,(म-१), मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र.मुद्रांक-२०१२/प्र.क्र.२५/म-१, दि. १९/०३/२०१३.

---

क्र.का.४/प्र.क्र.२४७/१२/७०७
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-१
दिनांक :- २५/०३/२०१३.

**परिपत्रक** :-

**प्रस्तावना** :-

महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ चे नियम ४४ मध्ये दस्त नोंदणी करण्यापूर्वी दुय्यम निबंधकांनी कोणकोणत्या बाबींची पडताळणी केली पाहिजे याबाबत तरतूद आहे. या नियमातील खंड ई नुसार, त्या दस्ताद्वारे उद्देशित असणाऱ्या व्यवहाराबाबत केंद्र अथवा राज्य शासन यांच्या एखाद्या कायद्यान्वये निर्बंध असेल तर त्या कायद्यातील तरतुदीप्रमाणे सक्षम प्राधिकारी यांची परवानगी अथवा नाहरकत प्रमाणपत्राची सत्यप्रत दस्तासोबत जोडली पाहिजे व त्या परवानगी / नाहरकत प्रमाणपत्रातील नमूद कोणत्याही प्राणभूत अटी व शर्तींचे विसंगतीने तो दस्तऐवज लिहिलेला नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी दुय्यम निबंधकांवर आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ३६ व ३६ अ नुसार आदिवासी व्यक्तीच्या वहिवाटींचे बिगर आदिवासी व्यक्तीच्या लाभात विक्री, बक्षीस, अदलाबदल, गहाण, भाडेपट्टा किंवा **अन्य प्रकारे** हस्तांतरण राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय व जिल्हाधिकारी यांच्या पूर्व मंजुरीशिवाय प्रतिबंधित आहे.

संदर्भित शासन पत्र व त्यासोबतच्या विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायान्वये असे कळविण्यांत आले आहे की, उपरोक्त तरतुदीमध्ये नमूद **अन्य प्रकारे** या व्याप्तीमध्ये विकसन करारनामे व कुलमुखत्यारपत्रांचा देखील समावेश होतो. या प्रकारे अभिप्राय कळवून शासन स्तरावरुन असे कळविण्यांत आले आहे की, राज्यशासन व जिल्हाधिकारी यांच्या पूर्व मंजुरीशिवाय, आदिवासी व्यक्तीच्या जमिनींची कुलमुखत्यारपत्रे व विकसन करारनामे विधीअग्राहय ठरतात.

**यास्तव राज्यातील सर्व दुय्यम निबंधक यांना सूचित करण्यांत येते की,**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ३६ व ३६ अ नुसार आदिवासी व्यक्तीच्या वहिवाटींचे बिगर आदिवासी व्यक्तीच्या लाभात विक्री, बक्षीस, अदलाबदल, गहाण, भाडेपट्टा, विकसन करार व कुलमुखत्यारपत्रे या द्वारे हस्तांतरण राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय व जिल्हाधिकारी यांच्या पूर्व मंजुरीशिवाय प्रतिबंधित असल्याने, राज्य शासनाच्या व जिल्हाधिकारी यांच्या पूर्व मंजुरीची सत्यप्रत सोबत जोडली असेल तरच अशा दस्तऐवजांची नोंदणी करण्यांत यावी.

सही/XXX
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य पुणे.**

प्रति,

१) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक / दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी, मुंबई शहर / उपनगर.
२) सर्व सह जिल्हा निबंधक.
३) सर्व दुय्यम निबंधक (संबंधित सह जिल्हा निबंधक यांचेमार्फत).
४) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

प्रत :- कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग,(म-१), मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीकरिता.

निर्गमित
25/3/13

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य पुणे करिता.**